23 DEC 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नॅक’चा नवा चक्रव्यूह भेदण्यास गुणवत्ता हवी

## जगन्नाथ पाटील; शिवाजी विद्यापीठात ‘नॅक मूल्यांकनाचे बदलते स्वरुप’ याविषयी विवेचन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तावाढीसाठी विचारपूर्वक सिस्टीम जनरेटेड स्कोअर, स्टुडंट सॅटिस्फॅक्शन सर्व्हे, पिअर टीम व्हिजिट त्रिस्तरीय चक्रव्यूह ‘नॅक’ने रचला आहे. तो भेदावयाचा असेल तर गुणवत्तेला पर्याय नाही, असे प्रतिपादन ‘नॅक’चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. या व्याख्यानाचा विषय ‘नॅक मूल्यांकनाचे बदलते स्वरुप’ असा होता.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील विशेष व्याख्यानात ‘नॅक’चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून आर. के. कामत, देवानंद शिंदे, विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगुले उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, भारतीय उच्च शिक्षणातील शहरी-ग्रामीण हा भेद• लक्षात घेऊन संबंधित दरी सांधण्यासाठी काम करण्याची गरज ‘नॅक’ला वाटते. त्यामधून मूल्यमापनाचे नवे निकष निर्धारित केले आहेत. आजतागायत ‘नॅक’ समितीच्या भेटीचे सादरीकरण अधिक प्रमाणात होत असे. नव्या संरचनेत याला स्थान असणार नाही. यापुढील काळात शैक्षणिक संस्था ‘नॅक’ला जी माहिती सादर करतील, तिच्या पुराव्यादाखल सादर करावयाची कागदपत्रे, प्रमाणपत्रांचे प्रमाण ७० टक्के असेल. ज्या प्रक्रियांचे डॉक्युमेंटेशन करणे शक्य नसते, अशांचे मूल्यांकन पिअर टीमच्या भेटीद्वारे केले जाईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, उच्च शिक्षणासमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत प्रत्येक घटकाने सज्ज राहण्याची गरज आहे.

या कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांच्या आयक्यूएसी कक्षांचे समन्वयक, विद्यापीठ अधिविभागांचे प्रमुख व शिक्षक उपस्थित होते. विद्यापीठाच्या आयक्यूएसी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### पाटील म्हणाले

- देशातील उच्च शिक्षणक्षेत्रात जास्तीत जास्त खुलेपणा आणणे गरजेचे आहे.
- ‘नॅक’ने धोरण ठरवीत असताना देशाच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांना पाचारण केले.
- विद्यार्थी समाधान सर्वेक्षण हा या नव्या मूल्यांकनातील महत्वाचा घटक आहे

2 3 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तेची आंतरराष्ट्रीय तत्त्वे बनविण्यात शिवाजी विद्यापीठाचा सहभाग

## जगन्नाथ पाटील, देवानंद शिंदे यांची माहिती; युरोपियन युनियनसमवेतच्या प्रकल्पात संधी; निवड झालेले ग्रामीण भागातील पहिलेच विद्यापीठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशातील उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे व नव्या मार्गदर्शक तत्त्वांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारताने युरोपियन युनियनसमवेत 'इक्वाम-बाय' (एनहान्सिंग क्वालिटी ॲश्युरन्स मॅनेजमेंट अँड बेंचमार्किंग स्ट्रॅटेजीज इन इंडियन युनिव्हर्सिटीज) हा संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला आहे. यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे, अशी माहिती 'नॅक'चे सल्लागार, प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे दिली. या प्रकल्पात निवड झालेले शिवाजी विद्यापीठ हे ग्रामीण भागातील पहिलेच विद्यापीठ आहे.

डॉ. पाटील म्हणाले, जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरांत भारतातील एकही शिक्षणसंस्था नाही. हे लक्षात घेऊन उच्च शिक्षणाचे गुणवत्ता संवर्धन करण्याच्या दृष्टीने एशिया-पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क संस्थेचे अध्यक्षपद भूषवित असताना युरोपियन युनियनसमवेत चर्चा केली. त्यातून युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनार्थ संवादाचा सेतू निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित झाले. त्यानुसार, भारतातर्फे 'नॅक'ने आणि युरोप युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठाने समन्वयक संस्था म्हणून काम करण्याचे निश्चित झाले. सात कोटी रुपयांच्या या त्रैवार्षिक प्रकल्पात युरोपियन युनियन आणि भारतातील निवडक विद्यापीठे असून, यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश केला आहे. या निवडीमागे विद्यापीठाने राबविलेले अभिनव उपक्रम महत्त्वाचे ठरले आहेत. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, या प्रकल्पातील सहभागामुळे शिवाजी विद्यापीठ हे जागतिक शिक्षण क्षेत्राच्या नकाशावर आले असून, हा विद्यापीठाचा मोठा सन्मान आहे. या प्रकल्पात विद्यापीठ हे देशातील प्रादेशिक, ग्रामीण विद्यापीठांचे नेतृत्व करणार आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत हे विद्यापीठीय समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. या पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यामापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आदी उपस्थित होते.

### गुणवत्तेची कार्यप्रणाली होणार तयार

या प्रकल्पातील सर्व विद्यापीठे पुढील तीन वर्षे सर्व विद्यापीठीय व्यवस्थांचा अभ्यास करुन एक सर्वंकष व सर्वसमावेशक स्वरुपाची कार्यप्रणाली (टुलकिट) तयार करणार आहेत. सहभागी विद्यापीठांनी आपापल्या प्रकारच्या विद्यापीठांची माहिती संकलित करण्यासाठी पुढाकार घ्यावयाचा आहे. शिवाजी विद्यापीठाने देशातील प्रादेशिक विद्यापीठांसमोरील आव्हाने, संधी, आदी स्वरुपांतील माहिती संकलित करावयाची असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

### प्रकल्पातील सहभागी शैक्षणिक संस्था

या प्रकल्पात नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल (नॅक), शिवाजी विद्यापीठ, जादवपूर युनिव्हर्सिटी (कोलकाता), सिम्बॉयोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (पुणे), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (चेन्नई), युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, एज्युलिंक प्रायव्हेट लिमिटेड (बंगलोर), मँगलोर युनिव्हर्सिटी या भारतीय संस्था, तर युनिव्हर्सिटी दे बार्सिलोना स्पेन, नॅशनल एजन्सी फॉर क्वालिटी ॲश्युरन्स अँड ॲक्रिडिटेशन ऑफ स्पेन, कुंगलिगा टेक्निस्का होएगस्कोलन - केटीएच स्वीडन, युनिव्हर्सिटी देग्ली स्टडी दी रोमा ला सॅपिएंझा- युनिरोमा-वन इटली, युनिव्हर्सिटी दे मॉंटपेलीअर- यूएम- फ्रान्स, युनिव्हर्सिटी ऑफ निकोसिआ, यूएन- सायप्रस या युरोपियन संस्थांचा समावेश असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

23 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रकल्पात शिवाजी विद्यापीठ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला आहे. यासाठी भारतातर्फे 'नॅक' (बंगळुरू) समन्वयक आहे. भारतातर्फे निवडलेल्या आठ शैक्षणिक संस्थांमध्ये येथील शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे', अशी घोषणा 'नॅक'चे सल्लागार आणि प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

**'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांची घोषणा**



नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

डॉ. पाटील म्हणाले, 'भारतामध्ये अनेक गुणवत्ताप्राप्त शिक्षण संस्था आहेत. मात्र जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरात त्यामधील एकही नाही. ही बाब हेरून उच्चशिक्षणाचे गुणवत्ता संवर्धन करण्यासाठी एशिया-पॅसिफिक क्वालिटी नेटवर्कचे अध्यक्षपद भूषवित असताना युरोपियन युनियनशी संवाद साधला. त्यातून 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारतात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संवादाचा पूल निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित केले. नॅक आणि युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठ समन्वयक संस्था म्हणून काम पाहिल. 'एनहान्सिंग क्वालिटी एश्युरन्स मॅनेजमेंट अॅन्ड बेंचमार्किंग स्ट्रॅटेजिस इन इंडियन युनिव्हर्सिटीज' (EQUAM-BI) असे या प्रकल्पाचे नाव आहे.'

डॉ. पाटील म्हणाले, 'सुमारे एक दशलक्ष युरो खर्चाच्या या त्रैवार्षिक प्रकल्पात निवडक नामवंत विद्यापीठांचा समावेश आहे. त्या आठ विद्यामीठांत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. या निवडीमागे शिवाजी विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टिसेस महत्त्वाच्या ठरल्या. विद्यापीठात स्टुडंट सॅटिसफॅक्शनचे सर्वेक्षण गेली अनेक वर्षे सुसूत्र पद्धतीने सुरू आहे. नॅकने राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून नोंद घेतली आहे. या उपक्रमाचा नव्या मूल्यांकन पद्धतीत समावेशही केला आहे.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या पुढील बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला मिळाली आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत हे या उपक्रमाचे समन्वयक असतील.'

## महिला नेतृत्वावर भर

'जगभरातील तसेच देशभरातील विद्यापीठाच्या कुलगुरूपदासह अन्य वरिष्ठ पदावर कार्यरत असलेल्या महिलांच्या प्रमाणाचा आढावा घेतला असता हे प्रमाण केवळ तीन टक्के आहे.. गुणवत्तावृद्धीच्या निकषांमध्ये शैक्षणिक संस्थांमधील महिला नेतृत्वाचा विचार गांभीर्याने करण्यात येत आहे. त्यामुळे नॅक मूल्यांकनापासून ते आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील महिलांच्या नेतृत्वावर भविष्यात भर देण्यात येणार आहे' असल्याची माहिती कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितली.

23 DEC 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रकल्पात शिवाजी विद्यापीठाला स्थान

## नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांची माहिती : भारत व युरोपियन युनियनमध्ये संयुक्त प्रकल्प

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्चशिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यासाठी भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे समन्वयक म्हणून भारतातर्फे 'नॅक' (बंगळूर) काम पाहत आहे. भारतातर्फे निवडण्यात आलेल्या आठ भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती 'नॅक'चे सल्लागार व प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी दिली. तसेच येत्या तीन वर्षांत शिवाजी विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्तेबद्दल नवीन मापदंड निर्माण करेल, असा विश्वासही त्यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, देशात अनेक गुणवत्ताप्राप्त शिक्षण संस्था कार्यरत आहेत. मात्र जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरमध्ये यातील एकाही संस्थेचा समावेश नाही. 'एशिया-पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क' संस्थेचे अध्यक्षपद भूषवित असताना युरोपियन युनियनबरोबर संवाद साधला. त्यातून युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमाची माहिती घेतली. या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित केले. त्यानुसार, भारतातर्फे नॅकने आणि युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठाने समन्वयक संस्था म्हणून काम पाहण्याचे ठरले आहे. क्वालिटी एक्सपर्टसनी निवडलेला हा प्रकल्प आहे.

विद्यापीठात स्टुडंट सॅटिसफॅक्शनचे सर्वेक्षण गेली अनेक वर्षे अत्यंत सुसूत्र पद्धतीने सुरू आहे, हे वेगळेपण आहे. त्याची नॅकने आपल्या राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून नोंद घेतली आहे. या उपक्रमाचा नव्या नॅक मूल्यांकन पद्धतीत समावेशही केला आहे. ही सर्व विद्यापीठे पुढील तीन वर्षे सर्व विद्यापीठीय व्यवस्थांचा अभ्यास करून एक सर्वंकष व सर्वसमावेशक स्वरूपाची कार्यप्रणाली तयार करणार आहेत. सहभागी विद्यापीठांची माहिती संकलित करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. शिवाजी विद्यापीठाने देशातील प्रादेशिक विद्यापीठांची माहिती संकलित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या आगामी बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहितीही दिली.



**कोल्हापूर : पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. जगन्नाथ पाटील. सोबत डॉ. आर. के. कामत, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे.**

### बेस्ट प्रॅक्टीसमुळे विद्यापीठाची निवड...

सुमारे एक दशलक्ष युरो किंमतीच्या (सुमारे ७ कोटी) या त्रैवार्षिक प्रकल्पात युरोपियन युनियनमधील तसेच भारतातील निवडक नामवंत विद्यापीठांचा समावेश केला आहे. संबंधित आठ विद्यापीठांत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला. या निवडीसाठी विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टीसेस हा भाग अत्यंत महत्वाचा ठरल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017

पुढारी

# आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पात शिवाजी विद्यापीठ



- नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांची घोषणा
- ग्रामीण शिक्षणक्षेत्राचे नेतृत्व करण्याची संधी : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला आहे. भारतातर्फे नॅक (बंगळूर) त्याचे समन्वयक म्हणून काम पहात आहे. त्याचप्रमाणे भारतातर्फे निवडण्यात आलेल्या आठ भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला असल्याची घोषणा 'नॅक'चे सल्लागार तसेच या प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात पत्रकार परिषदेत केली. विद्यापीठास ग्रामीण शिक्षणक्षेत्राचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली असल्याचे प्रशंसोद्गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी यावेळी काढले.

डॉ. पाटील म्हणाले, युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संवादाचा पूल निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार, भारततर्फे नॅकने आणि युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठाने समन्वयक संस्था म्हणून काम पहावयाचे ठरले. सुमारे एक दशलक्ष युरो किमतीच्या या त्रैवार्षिक प्रकल्पात युरोपियन युनियनमधील तसेच भरतातील निवडक नामवंत विद्यापीठांचा समावेश करण्यात आला असून, त्या आठ विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला. या निवडीमागे शिवाजी विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टिसेस अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या. नॅकने आपल्या राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून याची नोंद घेतलेली आहे. शिवाजी विद्यापीठाने देशातील प्रादेशिक विद्यापीठांचा डाटा संकलित करणे अभिप्रेत आहे, असे त्यांनी सांगितले.

निवडीबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या पुढील बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहितीही दिली.

पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदी उपस्थित होते.

## प्रकल्पात समाविष्ट भारतीय संस्था

- *नॅशनल असेसमेंट अँड अक्रिडिटेशन कौन्सिल– नॅक (भारतीय समन्वयक)*
- *शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*
- *जादवपूर युनिव्हर्सिटी, कोलकाता*
- *सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे*
- *इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मद्रास*
- *युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, म्हैसूर*
- *एज्युलिंक प्रायव्हेट लिमिटेड, बंगळूर*
- *मेंगलोर युनिव्हर्सिटी, मेंगलोर*

2 3 DEC 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# युरोपियन युनियन संस्थेसमवेत सहकार्य प्रकल्प

## भारतातर्फे आठ संस्थांत शिवाजी विद्यापीठाचा समावेश

कोल्हापूर, ता. २२ : भारतीय उच्च शिक्षणातील गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यासाठी भारताने युरोपियन युनियन संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला असून भारतातर्फे 'नॅक' (बंगळूर) त्याचे समन्वयक म्हणून काम पाहत आहे. या प्रकल्पासाठी भारतातर्फे निवडण्यात आलेल्या आठ भारतीय शैक्षणिक संस्थांत येथील शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती 'नॅक'चे सल्लागार व प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. पाटील म्हणाले, "भारतामध्ये अनेक गुणवत्ताप्राप्त शिक्षण संस्था आहेत. मात्र जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरात त्यामधील एकही शैक्षणिक संस्था नाही. भारतीय उच्चशिक्षणाचे गुणवत्ता संवर्धन केल्यास ही उणीव भरून निघेल. त्या दृष्टीने एशिया-पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क संस्थेचे अध्यक्षपद भूषवत असताना युरोपियन युनियनबरोबर संवाद साधला. युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन व भारत यांच्यात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी 'एनहान्सिंग क्वालिटी एश्युरन्स मॅनिजमेंट अँड बेंचमार्किंग स्ट्रॅटेजिस इन इंडियन युनिव्हर्सिटीज' हा संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे ठरवले. या प्रकल्पांतर्गत भारतातर्फे नॅकने व युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठ समन्वयक म्हणून काम पाहील."

### प्रकल्पातील शैक्षणिक संस्था

**युरोपियन संस्था :** युनिव्हर्सिटी दे बार्सिलोना - स्पेन, नॅशनल एजन्सी फॉर क्वालिटी अॅश्युरन्स अँड अॅक्रिडिटेशन ऑफ स्पेन, कुंगलिगा टेक्निस्का होएगस्कोलन - स्वीडन, युनिव्हर्सिटी देग्लि स्टडी दी रोमा - इटली, युनिव्हर्सिटी दे माँटपिलर - फ्रान्स, युनिव्हर्सिटी ऑफ निकोसिआ.

**भारतीय संस्था :** नॅशनल असेसमेंट अँड अॅक्रिडिटेशन कौन्सिल-नॅक (भारतीय समन्वयक), शिवाजी विद्यापीठ - कोल्हापूर, जादवपूर युनिव्हर्सिटी - कोलकता, सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी - पुणे, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी - मद्रास, युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, एज्युलिंक प्रायव्हेट लिमिटेड - बेंगलो, मेंगलोर युनिव्हर्सिटी - मेंगलोर

ते म्हणाले, "सुमारे एक दशलक्ष युरो किमतीच्या या त्रैवार्षिक प्रकल्पात युरोपियन युनियन व भारतातील निवडक नामवंत विद्यापीठांचा समावेश केला आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टिसेसमुळे विद्यापीठाची प्रकल्पासाठी निवड केली आहे. या उपक्रमाचा नव्या नॅक मूल्यांकन पद्धतीत समावेशही केला आहे. ही सारी विद्यापीठे पुढील तीन वर्षे सर्व विद्यापीठीय व्यवस्थांचा अभ्यास करून सर्वंकष व सर्वसमावेशक स्वरूपाची कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे."

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. पाटील यांना प्रकल्पासाठी धन्यवाद दिले. त्याचप्रमाणे या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या पुढील बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहिती दिली. विद्यापीठाच्या अंतर्गत डॉ. आर. के. कामत हे या उपक्रमासाठी समन्वयक म्हणून काम पाहतील.

23 DEC 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पात शिवाजी विद्यापीठ


## – डॉ. जगन्नाथ पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला असून, भारतातर्फे 'नॅक' (बेंगळुरू) त्याचे समन्वयक म्हणून काम पाहत आहे. भारतातर्फे निवडण्यात आलेल्या आठ भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये येथील शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती 'नॅक'चे सल्लागार तसेच या प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जगन्नाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, भारतामध्ये अनेक गुणवत्ताप्राप्त शिक्षण संस्था आहेत. तथापि, जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरात त्यामधील एकही नाही. नेमकी ही बाब हेरून भारतीय उच्च शिक्षणाचे गुणवत्ता संवर्धन करण्याच्या दृष्टीने एशिया-पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क या संस्थेचे अध्यक्षपद भूषवत असताना युरोपियन युनियनबरोबर संवाद साधला. त्यातून युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संवादाचा पूल निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार भारतातर्फे नॅकने आणि युनियनतर्फे स्पेनच्या बार्सिलोना विद्यापीठाने समन्वयक संस्था म्हणून काम पाहावयाचे ठरले. 'एनहान्सिंग क्वालिटी अॅश्युरन्स मॅनेजमेंट अॅन्ड बेंचमार्किंग स्ट्रॅटेजिस इन इंडियन युनिव्हर्सिटीज' असे या प्रकल्पाचे नाव आहे.

डॉ. पाटील पुढे म्हणाले, सुमारे एक दशलक्ष युरो किमतीच्या या त्रैवार्षिक प्रकल्पात युरोपियन युनियनमधील तसेच



### प्रकल्पात समाविष्ट शैक्षणिक संस्थांची नावे

**युरोपियन संस्था :** युनिव्हर्सिटी दे बार्सिलोना- स्पेन, नॅशनल एजन्सी फॉर क्वालिटी अॅश्युरन्स अँड अॅक्रिडिटेशन ऑफ स्पेन, कुंगलिगा टेक्निस्का होएगस्कोलन- स्वीडन, युनिव्हर्सिटी देग्ली स्टडी दी रोमा - इटली, युनिव्हर्सिटी दे मॉंटपिलर- फ्रान्स, युनिव्हर्सिटी ऑफ निकोसिआ.

**भारतीय संस्था :** नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रिडिटेशन कौन्सिल- नॅक (भारतीय समन्वयक), शिवाजी विद्यापीठ-कोल्हापूर, यादवपूर युनिव्हर्सिटी- कोलकता, सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी- पुणे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी - मद्रास, युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, एज्युलिंक प्रायव्हेट लिमिटेड - बेंगळुरू, मेंगलोर युनिव्हर्सिटी - मेंगलोर.

भरतातील निवडक नामवंत विद्यापीठांचा समावेश करण्यात आला असून, त्या आठ विद्यापीठांत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला. या निवडीमागे शिवाजी विद्यापीठाने राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टिसेस अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या. विद्यापीठात स्टुडंट सॅटिसफॅक्शनचे सर्वेक्षण गेली अनेक वर्षे अत्यंत सुरळीत व सुसूत्रपद्धतीने सुरू आहे, हे वेगळेपण आहे. त्याची नॅकने आपल्या राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून नोंद घेतलेली आहे. या उपक्रमाचा नव्या नॅक मूल्यांकन पद्धतीत समावेशही केला आहे. ही सारी विद्यापीठे पुढील तीन वर्षे सर्व विद्यापीठीय व्यवस्थांचा अभ्यास करून एक सर्वंकष व सर्वसमावेशक स्वरूपाची कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे.

या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी डॉ. पाटील यांना धन्यवाद दिले. या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारतात होणाऱ्या पुढील बैठकीचे यजमानपद भूषविण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाल्याची माहितीही दिली. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत हे या उपक्रमासाठी विद्यापीठीय समन्वयक म्हणून काम पाहतील, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017

Times of India

# SUK to be part of joint Indo-EU project

Piyush.Bhusari
@timesgroup.com

## BOOSTING EDU STANDARDS

- Preparing a tool kit to guide and support specific aspects of quality management, but with flexibility to cope with diverse contexts
- European partners will spend around 1 million euros on the project
- Targeting three critical areas— teaching and learning, research and innovation, and internationalisation of institutes
- It will take around three years to complete the project


SHIVAJI UNIVERSITY... STANDING TALL

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has been named one of the partners in the joint Indo-European Union (EU) project for the enhancement of quality education.

The project is named Enhancing Quality Assurance Management and Benchmarking Strategies in Indian Universities. It will involve Indian partners such as Indian Institute of Technology Madras, Jadavpur University, University of Mysore, Symbiosis International (Deemed University), Mangalore University, Edulink private limited among others.

The National Assessment and Accreditation Council (NAAC) will be the Indian coordinator for the program, while the European coordinator will be Universitat de Barcelona (UB) in Spain.

NAAC advisor Jagannath Patil said the European partners will include Kungliga Tekniska Hoegskolan (KTH) from Sweden, University of Nicosia in Cyprus, University de Montpellier from France, Universita degli Studi di Roma in Italy.

Patil, an SUK alumnus, said that despite having the second largest higher education system in the world, India faces major challenges in the sector. The project is designed to address the most significant and overreaching challenges such as inadequate quality assurance management, proper support to governance and decision making for institutional advancement.

Patil added that the project will explore comparative analysis of Indian universities with their European counterparts for preparing a benchmarking toolkit and a program of capacity building. The project is targeted at three specific and critical areas— teaching and learning, research and innovation, and taking institutes to the global level.

Patil said that Indian higher education system needs to explore the shared understanding of challenging issues and its common solutions. European universities are well known for their approach and many of them are ranked within the 100 best institutions across the globe.

Patil said that both partners will collect data from their respective education system and analyse them to create a toolkit, which will be used for benchmarking relevant to quality management.

He said that the project does not aim at any kind of ranking exercise through comparison of data sets between Indian and European higher educational institutions. It will explore in-depth importance of contexts relevant to Indian education system.

When asked, if it will complement the union government's ambitious project 'Institutions of Eminence', wherein 10 public and 10 private universities from across the country will be developed with world-class approach, Patil said that indeed it will.

However, this project is being conducted in a larger spectrum and will take around three years to complete. The European partners will be spending around 1 million euros for the project, he added.

Vice-chancellor of SUK Devanand Shinde said the initiative is a new (practical and sustainable) approach to benchmarking that can support the development of educational institutions.

Shinde added that the first meeting regarding the project was conducted between Indian and European counterparts in Bengaluru from December 6-7.

The second meeting is scheduled in Barcelona, Spain, next year in February.

"We are hoping that the third meeting could be organised in the SUK campus in 2018," Shinde said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटना स्थापन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा अधिकृतरीत्या माजी विद्यार्थी संघटना स्थापन झाली असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाची अधिकृत माजी विद्यार्थी संघटना नव्हती. जगभरातील नामवंत विद्यापीठांमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान मोठे असते. आपल्या विद्यापीठाचे विद्यार्थीसुद्धा जगभर विविध क्षेत्रांत नाव कमावत आहेत. या सर्वांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी संघटना काम करेल. याबाबत नोंदणी करण्यात आली आहे. लवकरच संघटनेचे काम सुरू होईल.

कुलगुरूपदाचा विचार केला तर महिलांचे प्रमाण अतिशय कमी आहे. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या पदांवर महिलांचे नेतृत्व वाढवण्यासाठी विद्यापीठाच्या विविध समित्यांमध्ये महिलांना प्राधान्य दिले जात असल्याची माहिती यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिली.

23 DEC 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात महिलांना प्रतिनिधित्व

## देवानंद शिंदे; विविध समितींवर संधी, माजी विद्यार्थी संघटना स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महिलांमधील नेतृत्व विकसित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पाऊल टाकले आहे. विद्यापीठातील विविध समितींमध्ये महिलांना प्रतिनिधित्व दिले जाणार आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, जगातील विद्यापीठातील कुलगुरु, कुलसचिव, आदी वरिष्ठ पदांवर कार्यरत असणाऱ्या महिलांचे प्रमाण अवघे तीन टक्के आहे. ते लक्षात घेऊन गुणवत्तावाढीच्या निकषांमध्ये शैक्षणिक संस्थांमधील महिला नेतृत्वाचा विचार गांभीर्याने केला जात आहे. त्यामुळे नॅक मूल्यांकन, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील महिलांना प्रतिनिधीत्व देऊन त्यांच्यातील नेतृत्व विकासावर भर दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने विद्यापीठातील प्रशासकीय, शैक्षणिक प्रकल्प, उपक्रम आदींबाबतच्या समित्यांमध्ये महिलांना प्रतिनिधीत्व दिले जाणार आहे. तसेच माजी विद्यार्थी संघटना अधिकृतपणे स्थापन केली आहे.

13 DEC 2017

लोकमत

# विद्यापीठातील पाच दिवसीय कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील समावेशी शिक्षण केंद्र व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्राच्यावतीने बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये अंध विद्यार्थ्यांसाठी पाचदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचा समारोप शुक्रवारी विविध कार्यक्रमांनी झाला.

कार्यक्रमास पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत हे उपस्थित होते. यावेळी संग्राम किल्लेदार, प्रशिक्षणार्थी ग्रंथालय सहाय्यक व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र सहाय्यक शरद पाटील, यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संतोष परीट, सागर देशमुख, महेश आडके, शुभम चौगले, प्रिती बागी, सुरज शेख यांनी मनोगत मांडले. डॉ. पी. डी. राऊत यांनी, अंधाकरिता कार्यरत विविध संस्था व सोयी याबरोबरच स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर्स, ब्रेलीचा वापर व विविध सॉफ्टवेअर्सद्वारे तंत्रज्ञानाचे उपाययोजन याविषयी मार्गदर्शन केले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्याकरीता त्यांनी शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017
तरुण भारत

# डॉ. मुणगेकर यांचे २८ रोजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे माजी सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे 'असमानतेची आव्हाने: स्थानिक ते वैश्विक' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हे व्याख्यान २८ डिसेंबर रोजी विद्यापीठातील सिनेट सभागृहामध्ये दुपारी २.३० वाजता होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित असतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017

सकाळ

# वसंत डहाके यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २२ : ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या साहित्यावर शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे शुक्रवारी (ता. २९) एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. वि. स. खांडेकर भाषाभवनामध्ये सकाळी साडेदहा वाजता त्यास सुरवात होईल. चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर यांचे आहे. डॉ. वसंत पाटणकर (मुंबई), प्रा. डॉ. सुषमा करोगल (बडोदा), डॉ. अविनाश कोल्हे (मुंबई), डॉ. नितीन रिंढे (मुंबई), प्रा. प्रवीण बांदेकर (सावंतवाडी), प्रा. अविनाश सप्रे (सांगली) हे वसंत आबाजी डहाके यांचे काव्यलेखन, ललित गद्य, कादंबरी लेखन, समीक्षा, भाषांतर कार्य विषयांवर निबंध सादर करणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 DEC 2017

लोकमत

# विद्यापीठ संघाच्या कर्णधारपदी घाडगे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भोपाळ येथे २४ ते २७ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी



कोल्हापूरच्या सुमित संजय घाडगे याची शिवाजी विद्यापीठ संघाच्या कर्णधारपदी निवड झाली.

तो कऱ्हाड येथील सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. सुमित हा सध्या बालगोपाल तालीम संघाकडून वरिष्ठ गटात खेळत आहे. त्याला प्रा.अभिजित वणिरे, अमर सासने आणि बाबूराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे : रणवीर खालकर (गोलरक्षक), सुमित घाडगे (कर्णधार), हृषीकेश मेथे-पाटील, पवन माळी, सिद्धेश यादव, रणजित विचारे, राहुल पाटील, ओंकार जाधव, ओंकार पाटील, श्रीधर परब, संदीप गोंधळी, वृषभ ढेरे, प्रतीक बदामे, संकेत अनिल साळोखे, सागर पोवार, संकेत नितीन साळोखे, ओंकार साळवी, ओंकार खोत, प्रतीक सावंत, प्रशिक्षक प्रा. अभिजित वणिरे, सहाय्यक प्रशिक्षक - अमर सासने

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघाची घोषणा

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथे २४ ते २७ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या २० खेळाडूंचा संघ निवडण्यात आला आहे. संघ प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे व सहायक प्रशिक्षक प्रा. अमर सासने यांनी संघ निवडीची घोषणा केली. तसेच कराडच्या सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालयाचा खेळाडू सुमीत घाडगेकडे कर्णधारपदाची धुरा सोपवली.

**विद्यापीठ संघ :** ओंकार पाटील, ओंकार जाधव, ऋषिकेश मेथे–पाटील, प्रतिक बदामे, ऋषभ ढेरे (शहाजी कॉलेज), पवन माळी, संदीप गोंधळी, राहूल पाटील, रणजित विचारे, संकेत नितीन साळोखे (न्यू कॉलेज), सिद्धेश यादव, संकेत अनिल साळोखे, ओंकार साळवी, ओंकार खोत, अक्षय सरनाईक (स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे), अक्षय सावंत (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), सागर पोवार, श्रीधर परब, रणवीर खालकर (गोलरक्षक).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2017

लोकमत

# विद्यापीठात गुरुवारी मुणगेकर यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे केंद्र सरकारच्या नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे गुरुवारी (दि. २८) दुपारी तीन वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे. 'असमानतेची आव्हाने ; स्थानिक ते वैश्विक' असा व्याख्यानाचा विषय आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असतील.

23 DEC 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तेवरच 'नॅक'चा नवा चक्रव्यूह भेदता येईल

## डॉ. जगन्नाथ पाटील; 'नॅक' मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरूपावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नॅक मूल्यांकनाचे बदललेले स्वरूप म्हणजे भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्ता वाढीसाठी अत्यंत विचारपूर्वक रचलेला चक्रव्यूह आहे. या चक्रव्युहास भेदण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी त्या तोडीची गुणवत्ताच प्रदर्शित कर आवश्यक ठरणार आहे, असे प्रतिपादन नॅक (बंगळूर) चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी शुक्रवारी येथे केले.



**शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'नॅक' मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरुपाच्या अनुषंगाने आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. जगन्नाथ पाटील, व्यासपीठावर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगुले आदी मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'नॅक' मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरूपाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. पाटील यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. पाटील म्हणाले, भारतीय उच्चशिक्षणातील शहरी-ग्रामीण हा भेद लक्षात घेऊन ही दरी साधण्यासाठी काम करण्याची गरज नॅकला वाटते. त्यामधून मूल्यमापनाचे नवे निकष तयार करण्यात आले. नवनवीन अभिनव संकल्पना, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देत असतानाच दर्जाच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करण्याचे धोरण नॅकने स्वीकारले आहे. त्यासाठी हे धोरण ठरवित असताना देशाच्या उच्चशिक्षण क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. त्यातूनच सिस्टीम जनरेटेड स्कोअर, स्टुडंट सॅटिसफॅक्शन सर्व्हे आणि पिअर टीम व्हिजिट असा गुणवत्ता वर्धनासाठीचा त्रिस्तरीय चक्रव्यूह रचणे नॅकला शक्य झाले. हा भेदावयाचा असेल, तर गुणवत्तेला पर्याय नाही. तिथे अन्य कोणत्याही मार्गाचा अवलंब करता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, उच्चशिक्षणासमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत प्रत्येक घटकाने सज्ज राहण्याची गरज आहे. नॅकच्या नव्या मूल्यांकन पद्धतीत संबंधित संस्थेच्या बेस्ट प्रॅक्टीसेसना मोठे महत्त्व आहे. प्रत्येक संस्थेत अंगभूत अशा काही बेस्ट प्रॅक्टीसेस असतातच, नॅकमुळे त्या समाजासमोरच नव्हे, तर देशासमोर सादर करण्याची संधी मिळते. ही संधी प्रत्येक शिक्षण संस्थेने घेतली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विद्यापीठाच्या आयक्यूएसी कक्षाचे समन्वयक डॉ. आर.के. कामत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागांचे प्रमुख व शिक्षक उपस्थित होते.